प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# ‘रवळनाथ’कडून ५०० कोटी ठेवींचा टप्पा पार

## संस्थापक अध्यक्ष चौगुले यांची माहिती : बँकेत रुपांतर करण्याचा मानस

**चिकोडी : पुढारी वृत्तसेवा**

गडहिंग्लज येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स (मल्टी-स्टेट) या संस्थेने २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या प्रारंभी ५०० कोटी रूपये ठेवींचा टप्पा पार करण्याचा संकल्प केला होता. तो ३१ मार्चपुर्वी गुढीपाडव्याच्या आणि नूतन वर्षाच्या पूर्वसंध्येला पूर्ण होऊन ५०० कोटी ठेवींची संकल्पपूर्ती झाली. त्यामुळे संस्थेचे बँकेत रुपांतर करण्याचा मानस आहे, अशी माहिती ‘रवळनाथ’ चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.



एम. एल. चौगुले

चौगुले म्हणाले, पारदर्शक व्यवहार, तत्पर सेवा आणि सभासद, ग्राहकांनी दाखवलेला विश्वास यामुळेच संस्थेने अल्पावधीत मोठी प्रगती केली आहे. संस्थेच्या अनेक ठेवीदारांनी गुंतवणूक करून हा विश्वास अधिक दृढ केला आहे. संस्थेच्या आजरा, गडहिंग्लज, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगाव, निपाणी, कुडाळ, सुविधा केंद्र गडहिंग्लज, सांगली, पुणे, कराड, सांगोला, चिकोडी या १५ शाखांमधून मोठ्या प्रमाणात ठेवी जमा झाल्या आहेत. यामध्ये गडहिंग्लज शाखेने १५१ कोटी ठेवींचा टप्पा पार केला आहे. ५०० कोटी ठेवींसाठी अन्य पतसंस्थांनीदेखील आपल्या ठेवी ठेवून सहकार्य केले आहे. नवनवीन योजना आणि उत्तम ग्राहक सेवा देण्याचा आमचा प्रयत्न राहिला आहे. त्यामुळेच संस्थेने ५०० कोटी ठेवींचे लक्ष्य पूर्ण केले आहे. आगामी काळातदेखील संस्थेकडून सभासद, ग्राहकांना अत्याधुनिक सुविधा देण्यावर अधिक भर दिला जाईल. यासाठी संस्थेच्या उपाध्यक्षा मीना रिंगणे, सर्व संचालक, सर्व शाखांचे चेअरमन, सल्लागार, संस्थेचे सीईओ डी. के. मायदेव, अधिकारी, शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

Belgaum Edition
Mar 28, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com